# वसई विरार शहर महानगरपालिका

वैद्यकीय आरोग्य विभाग
महानगरपालिका मुख्य कार्यालय, 'ए' विंग,
सातवा मजला, यशवंत नगर, विरार (प.) ता. वसई, जि. पालघर – ४०१ ३०३
Email Id-mohvvcmc@gmail.com


**जावक क्र.वविशम/वैआवि /७३/२०२४** **दि.१९/०९/२०२४**

## // जाहीर सूचना //

**राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम अंतर्गत ठोक मानधनावरील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिका राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम अंतर्गत करार तत्वावर ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने २९ दिवस कालावधीसाठी रिक्त पदे भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांची निवड करणेकामी **क्षयरोग आरोग्य कार्यकर्ता व औषध निर्माता या संवर्गातील पदांच्या थेट मुलाखत न घेता गुणांकन (Merit) पध्दतीने पदभरतीची प्रक्रिया करण्यात येईल. तरी संबंधित पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या गुणपत्रके व प्रमाणपत्राच्या मूळप्रती व स्वक्षांकित सत्यप्रतींसह दि.२५/०९ /२०२४ ते दि.०४/१०/२०२४ रोजीपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत महानगरपालिका बहुउद्देशिय इमारत, प्रभाग समिती "सी" कार्यालय, चौथा मजला, विरार (पू.) येथे प्रत्यक्षात (By Hand) किंवा टपालाने/कुरीयरने सादर करण्यात यावेत.** दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. (टपालाने/कुरीयरने सादर करण्यात आलेले अर्ज विहीत कालावधीत या कार्यालयात पोहोचतील याची दक्षता घ्यावी. उशीरा व अपुर्ण प्राप्त अर्जाची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.)

| अ.क्र | पदाचे नाव | प्रवर्ग व पद संख्या | एकूण पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | मासिक एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | क्षयरोग आरोग्य कार्यकर्ता (TBHV) | वि.जा.(अ)- १<br>एसईबीसी - १<br>ईडब्ल्यू एस -१ | ३ | १.विज्ञान शाखेतील पदवीधर<br>किंवा<br>२.विज्ञान शाखेतील १२वीपरीक्षा उत्तीर्णआणिMPW/LHV/ ANM/ Health Worker म्हणून काम करण्याचा अनुभव<br>किंवा<br>आरोग्य शिक्षण / समुपदेशन यामधील उच्च प्रशिक्षण अभ्यास क्रम उत्तीर्ण<br>३.सरकारमान्यMSCIT अभ्यासक्रम उत्तीर्ण<br>४.बहुद्देशीयआरोग्य कार्यकर्त्याचे शासन मान्य प्रशिक्षण पूर्ण.<br>५.स्वच्छता निरीक्षक पदाचा शासनमान्य अभ्यासक्रम उत्तीर्ण. | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | मासिक ठोक वेतन १५,५००/- (रु.पंधरा हजार पाचशे मात्र तसेच कायम प्रवास भत्ता रु.१,५००/- ) |
| २ | औषध निर्माता (Pharmacists) | खुला - १ | १ | १.कोणत्याही मान्यता प्राप्त संस्थेमधून औषध निर्माता पदवी किंवा पदविका परीक्षा | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | मासिक ठोक वेतन १७,०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | उत्तीर्ण<br>२.नामांकित रुग्णालय किंवा शासनमान्य आरोग्य केंद्रात औषधसाठा व्यवस्थापन करण्यामध्ये १वर्षाचा अनुभव<br>२.उमेदवारास एम.एस.वर्ड, एक्सेल आणि सिम्पल स्टॅटीस्टीकल पॅकेजेस सह विविध संगणक प्रोग्रामिंगची चांगली माहिती असावी | | मात्र) |

सदर पदे ११ महिने२९ दिवसाच्या करारतत्वाने भरावयाची असून, समाधानकारक काम असल्यास उमेदवारास मुदत वाढ देण्यात येईल.

मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र मुंबई यांचे पत्र क्र.राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/पदभरती/१०६७०-११०१६/२०२३ दि.२७/०४/२०२३ राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत पदभरती प्रक्रियेमध्ये सुसूत्रिकरण येणाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे आहेत.

१) **गुणांकन पध्दती** –उपरोक्त थेट मुलाखतीमधील पदांव्यतिरिक्त इतर सर्व पदांकरितागुणांकन पध्दतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबवावी.

| **विवरण** | **तपशील** | **अधिकतम गुण** |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे proporation काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे proportion= ६०X५०/१००=३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे proportion काढावे. (उदा.१ Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त B.sc(Nursing) ही शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.sc(Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे proportion=६०X२०/१००=१२ गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत. (१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | एकूण १०० गुण |

अ) सदरील गुणानुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात यावी. त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात यावेत.

आ) गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे. तसेच उमेदवारांचे गुणांकन (Merit)

व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे.

इ) ज्या पदांकरीता कौशल्य चाचणी अनिवार्य करण्यात आली आहे त्या पदांकरीता पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यापूर्वी त्यांची उपसंचालक स्तरावर / जिल्हास्तरावर कौशल्य चाचणी घेण्यात यावी.

ई) गुणांकन पध्दतीनुसार भरण्यात येणाऱ्या पदांकरीता कोणत्याही प्रकारची मुलाखत घेण्यात येऊ नये, यांची नोंद घ्यावी.

**२**)वरील दोन्ही पध्दतीनुसार नियुक्ती आदेश दिलेल्या उमेदवारांच्या रुजू करुन घेण्यापूर्वी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे आणि इतर आवश्यक कागदपत्रे यांची तपासणी व खात्री करण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांची राहील.

**३**)पदभरतीच्या अनुषंगाने उमेदवारांशी संबंधित सर्व सूचना इत्यादी वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

**४**)पदभरतीबाबत यापूर्वी दिलेल्या सर्व सुचनांचे पालन करावे जसे, बिंदुनामावली, कंत्राटी नियुक्ती कालावधी, मानधन इत्यादी.

**५**)एकूण पदांच्या ५०% प्रतिक्षा यादी ठेवावी.

**६**)ज्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द केली जाते, त्याच संकेतस्थळावर पदभरती बाबतची सर्व माहिती अद्यावत करावी, जेणेकरुन उमेदवारांची गैरसोय होणार नाही. तसेच संबधितांनी आपल्या कार्यालयाच्या दूरध्वनी क्रमांक बंद असल्यास सुरु करावे. जेणेकरुन उमेदवारांना अपेक्षित सर्व माहिती पुरविणे सोईचे होईल.

**७**)पदभरतीची सद्यस्थिती संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्यावी जेणेकरुन उमेदवारांना त्यांकरीता संपर्क करण्याची आवश्यकता भासणार नाही.

वरील मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र मुंबई यांनी थेट मुलाखतीच्या अनुषंगाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करणे उचित होईल, असे मत आहे.

१.**वयोमर्यादा:-**

१.१ रुग्णसेवेशी संबंधित पदाची वयोमर्यादा वर्षे राहील, वय वर्षे नंतर प्रत्येक वर्षी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडून शारीरिकदृष्ट्या प्राप्त असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच पुन:नियुक्ती आदेश उमेदवारास देण्यात येईल.

१.२अर्जदार / उमेदवाराचे वय अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.

2.**सूचना–**

2.1 जाहिरातीत नमूद गुणांकानुसार अधिकारी व कर्मचाऱ्यांची ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवून गुणांकानुसार नियुक्ती करण्यात येईल.

2.2 निवड झालेले उमेदवार व प्रतीक्षा यादी मधील उमेदवार यांची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

3.**उमेदवार निवडण्याची पद्धत–**

3.1 ऑफलाईन पद्धतीने आलेल्या अर्जाची छाननी करण्यात येईल.

3.2 पात्र / अपात्र उमेदवारांची ऑनलाईन अर्जानुसार त्यांचे गुणांकानुसार यादी तयार करून संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

3.3 पात्र / अपात्र उमेदवारांच्या यादीवर हरकती मागवून त्यांचे निराकरण करण्यात येईल.

3.4 अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

3.5 निवड यादी प्रसिद्ध केल्यानंतर निवड झालेल्या उमेदवारांचे मूळ कागदपत्रे पडताळणी करून नियुक्ती आदेश देण्यात येतील.

**4. खालील क्रमवारीनुसार मूळ प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायाप्रती अर्जाच्या नमुन्यामध्ये भरून सादर करावे.**

अ)शाळा सोडल्याचा दाखला.

ब) अहृतेची प्रमाणपत्रे, तांत्रिक अहर्तेची प्रमाणपत्रे

क) संबंधित पदाशी निगडीत अनुभव प्रमाणपत्र

ड) डोमिसाईल प्रमाणपत्र (महाराष्ट्रात वास्तव्य)

इ) जातीचे प्रमाणपत्र / जातवैधता प्रमाणपत्र

ई) नॉनक्रिमेलीअर प्रमाणपत्र

एफ) आवश्यक कागदपत्रांची पूर्तता नसेल तर उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

4.2 पदांकरिता मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

4.3 फक्त याच जाहिरातीला अनुसरून प्राप्त झालेल्या उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील.

4.4 उमेदवारास एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास, पदनिहाय स्वतंत्र अर्ज वैयक्तिक माहितीसह (Bio-Data) व त्यासोबत शैक्षणिक पात्रता व इतर नमूद कागदपत्रे विहित नमुन्यात जोडून सादर करणेआवश्यक आहे. विहित नमुन्यात नसलेले / अपूर्ण अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

4.5 उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की, ते आवेदीत पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

4.6 शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१० दि.२७ जून २०११ नुसार

(I) उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागूराहणार नाही.

(II) सदर उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात देखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

(III) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारासाठी लागू राहतील. इतर उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

4.7 आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र (Cast Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची (Cast Validity Certificate)साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

4.8 एखाद्या अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी निवड समिती वरील अध्यक्ष, सदस्य तसेच अधिकाऱ्यांवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष, राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैर प्रकारचा अवलंब केल्यास, त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.

4.9 उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

4.10 शासन निर्णय क्र. संकीर्ण - २००७/पडताळणी/ नवि-२६, दि.२१/११/२००७ अन्वये निवड झालेल्या उमेदवाराचे चारित्र्य / पूर्व इतिहास याबाबत स्थानिक पोलीस यंत्रणेमार्फत पडताळणी करून घेऊन त्याच्या विरुद्ध कोणताही गुन्हा नोंदविण्यात आलेला नाही अथवा गुन्हा सिद्ध झालेला नाही, असे प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच उमेदवारास हजर करून घेण्यात येईल.

4.11 मा.सहसंचालक (अतांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे जा.क्र. राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/पदभरती/३४३५४-७०१/२०२३ दि.०९/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये

अ) सदरील गुणानुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List)तयार करण्यात यावी. त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात यावेत.

ब) गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे. तसेच उमेदवारांचे गुणांकन व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा सबंधित पदाशी निगडीत अनुभव जास्त

असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे.

4.12 अंतिम निवड यादीमधील पात्र उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या विविध प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती मूळ प्रमाणपत्रांच्या आधारे कागदपत्रे तपासणीच्या वेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती (Original Copy) कागदपत्रे तपासणीच्या वेळी उपलब्ध करून देणे उमेदवारांवर बंधनकारकराहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

4.13 निवड झालेल्या उमेदवाराची शैक्षणिक पात्रतेची मूळ प्रमाणपत्रे संबंधित मंडळ / विद्यापीठ / संस्था यांचे जवळ पाठवून सत्यता पडताळणी करण्यात येईल. त्यात खोटी आढळल्यास संबंधिताना नोकरीतून कमी करून फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

4.14 निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवार रद्द करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

4.15 जाहिरातीमधील नमूद पदसंख्या कमी अथवा अधिक करण्याचे तसेच कोणतीही भरती पदे रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत. पद संख्येच्या व आरक्षणाच्या बदलाबाबत उमेदवारांना संकेतस्थळावर अवगत करण्यात येईल.

4.16 प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना आहेत.

4.17 लहान कुटुंबाची प्रमाणपत्र २००५ नुसार जोडप्यात यावे. दोनपेक्षा अधिक ह्यात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.

4.18 वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असून, त्यांचा कालावधी अकरा महिने एकोणतीस दिवस आहे. तांत्रिक कारणास्तव सदर पदांना अर्थसंकल्पीय अंदाजपत्रात नियमित न करण्याबाबत मंजुरी मिळाल्यास पदे कधीही समाप्त करण्यात येतील.

4.19 वरील नमूद पदे ही राज्य शासनाची पदे नमूद निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही. तसेच यापदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.

4.20 केंद्र / राज्य शासनाने संबंधित पदे नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

4.21 अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम अथवा तसेच अर्ज्दाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

4.22 उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदांचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरिता नमूद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करावा. जर मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज आरक्षणामधून सादर केलेला असेल, परंतु सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास, उमेदवारांचा अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.

4.23 राखीव संवर्गातून अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी त्या संवर्गाचे जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. जातीचे प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभही घेता येणार नाही.

4.24 सदर भरतीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर भविष्यात जर एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिल्यामुळे जागा रिक्त झाल्यास गुणानुक्रमे पूर्ण यादीतील मेरीटमधील पुढील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया करता नियमानुसार नियुक्ती आदेश दिले जाती. सदर निवड यादी ही तयार झाल्यानंतर पुढील ११ महिन्यापर्यंत वैध राहील.

1) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोइनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता

येणार नाही.

2) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांच्या सध्या सुरु असलेल्या मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचूक नोंदवावा तसेच ते भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

3) एकूण पदाच्या ५०टक्के प्रतीक्षा यादी ठेवण्यात येईल.

4.25 उमेदवाराचा अर्ज अपूर्ण व अर्धवट भरलेला असल्यास नाकारला गेल्यास सर्वस्वी जबाबदारी ही उमेदवारांची राहील याबात उमेदवारांना तक्रार करता येणार नाही.

4.26 ठोक मानधनावर कंत्राटी पद्धतीने पदाना देण्यात येणारे मानधन हे शासनाने ठरवून दिल्यानुसार देण्यात इम. कुठलेही अतिरिक्त मानधन (मनपामार्फत) पदांना देण्यात येणार नाही.

4.27 आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक उमेदवारासाठी तत्सम अधिकरी यांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

4.28 संबंधित प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास गुणानुक्रमे इतर प्रवर्गातील उमेदवारांना तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक देण्यात येईल. त्यामुळे सदर जाहिरातीच्या अनुषंगाने सर्व प्रवर्ग तसेच खुल्या प्रवर्गातील उमेदवार अर्ज करू शकतात. रिक्त असणाऱ्या संवर्गातीलच उमेदवारांचे अर्ज स्वीकारले जातील.

4.29 उमेदवारास महाराष्ट्र परावैद्यक परिषद, मुंबई दि.१६/०६/२०२२च्या परिपत्रकानुसार Verification of Certificate नुसार प्रमाणपत्रासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

5. **विशेष सूचना** :

5.1 मध्यस्थ/ठक/महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती गैर मार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध रहावे. त्यातून फसवणूक झाल्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

5.2 सदर भरती प्रक्रियेतील निवड झालेल्या उमेदवारांचे कागदपत्रांव्यतिरिक्त उर्वरीत सर्व कागदपत्रे फक्त तीन महिन्यापर्यंत महानगरपालिकेकडे उपलब्ध राहतील.

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

**सही/-**
(डॉ. भक्ती चौधरी)
**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव**
राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# अर्जाचा नमुना

(वसई विरार शहर महानगरपालिका राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम अंतर्गत .............................................................................
या कंत्राटी पदासाठी अर्ज.)

उमेदवाराचा नजीकच्या काळातील (रुंदी ३.५ से.मी. व उंची ४.५ से.मी.) आकाराचा फोटो चिटकवून स्वत: साक्षांकीत करावा

**प्रति,**

मा. आयुक्त सो.
वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार
विरार (प.) ता. वसई, जि. पालघर ४०१ ३०३

**१) संपूर्ण नाव मराठी व इंग्रजी (कॅपिटल लेटर)**

| संपुर्ण नाव | मराठी | इंग्रजी (कॅपिटल लेटर) |
|---|---|---|
| १) आडनाव : | -------------------------------------- | ---------------------------------------- |
| २) स्वत:चे नाव : | -------------------------------------- | ---------------------------------------- |
| ३) वडिलांचे/पतीचे नाव : | -------------------------------------- | ---------------------------------------- |
| ४) आईचे नाव : | -------------------------------------- | ---------------------------------------- |

**२) पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता (पिन कोडसहित)**

----------------------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------------------

संपर्कासाठी दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक : ------------------------------------------

**३) जन्मतारीख**

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

दि.०१/०७/२०२४ रोजीचे वय

| वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|
| | | |

**४) शैक्षणिक अर्हता –**

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नाव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी व श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |

**५) अनुभव -**

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकूण वर्षे |
|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | |
| | | | |
| | | | |
| | | | |

**६) जातीचा प्रवर्ग लागू असलेल्या चौकटीमध्ये (✓ ) अशी खूण करावी.**

| अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्ल्युएस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

**७) आपणाविरुध्द न्यायप्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे का ? असल्यास थोडक्यात तपशील द्यावा.**

| **होय** | **नाही** |
|---|---|
| | |

**८) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.**

१. शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र व गुणपत्रिका (१०वी ~ १२वी ~ पदवी)
२. शाळा सोडल्याचा दाखला
३. रहिवाशी दाखला
४. अनुभवाचा दाखला
५. जातीचा दाखला
६. जात वैधता प्रमाणपत्र
७. नॉन क्रिमिलेयर दाखला
८. पॅन कार्ड व आधार कार्ड

**९) राष्ट्रीयत्व :** भारतीय / अभारतीय
**१०) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ?** : होय / नाही

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :- अर्जदाराची सही------------------

दिनांक :- / /२०२४ (नाव -----------------------------)

# लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र नमुना

श्री. /श्रीमती ---------------------------------------------------------------------------

श्री. ----------------------------------------------------------- यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी,

वय ---------- वर्ष, राहणार---------------------------------------------------------------------- याद्वारे

पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/ करते की,

१. मी ------------------------------------------------------- या कंत्राटी पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला ----------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या--------- इतकी आहे. (असल्यास, जन्म दिनांक नमूद करावा)

1) दि. ------/------/--------

2) दि. ------/------/--------

३. दिनांक २८ मार्च, २००५ रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे शासकीय नियमानुसार मी या पदासाठी अनर्ह अपात्र ठरेल याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :** **(अर्जदार स्वाक्षरी)**

**दिनांक : / /२०२४** (**अर्जदार नाव** -----------------------------